

टाकळीरोड येथील रामदास स्वामी मठात दासनवमीच्या पार्श्वभूमीवर अशी आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे.

# ‘मना सज्जना आस ही दर्शनाची’

## दासनवमीनिमित्त आयोजित कार्यक्रमांना भाविकांची गर्दी

प्रतिनिधी | नाशिक

टाकळीरोड येथील श्री समर्थ रामदास स्वामी मठ येथे दरवर्षीप्रमाणे मोठ्या उत्साहात दासनवमी सोहळा साजरा केला जातो. या सोहळ्यांतर्गत आयोजित विविध धार्मिक कार्यक्रमांत भाविकांचा मोठा सहभाग आहे.

आगरटाकळी येथील श्री मारुती देवस्थान आणि राष्ट्रसंत श्री समर्थ रामदास स्वामी मठात दरवर्षी दासनवमी



उत्सव साजरा करण्यात येतो. यंदाही २५ फेब्रुवारीपासून ते दासनवमीपर्यंत (दि. ३ मार्च) विविध धार्मिक कार्यक्रम, दासबोधाचे सामूहिक पारायण इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याचा समारोप गुरुवारी विविध धार्मिक कार्यक्रमांनी होणार आहे. या दिवशी पहाटेपासूनच कार्यक्रमांना प्रारंभ होणार आहे.

धार्मिक कार्यक्रमांतर्गत पूजा, अभिषेक, महाआरती असे कार्यक्रम सुरू आहेत. दासनवमीनिमित्त श्री रामदास स्वामी मठात सुरू असलेल्या दासबोधाच्या सामूहिक पारायणाला, तसेच दर्शनासाठी भाविकांची सकाळपासूनच गर्दी होत आहे. या सोहळ्यानिमित्त श्री रामदास स्वामी मठावर करण्यात आलेली विद्युत रोषणाईदेखील आकर्षण ठरत आहे. या सोहळ्याचा आणि दर्शनाचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विश्वस्त ज्योतीराव खैरनार यांनी केले आहे.